


६२

# लोकसेवा

भारतातील लोकसेवा (नागरी सेवा किंवा सरकारी सेवा) तीन प्रकारांत विभागल्या आहेत. अखिल भारतीय सेवा, केंद्रीय सेवा आणि राज्यसेवा. त्यांचा अर्थ खाली विशद केला असून रचना स्पष्ट केली आहे.

## अखिल भारतीय सेवा

केंद्र व राज्य सरकारमध्ये समान असलेल्या सेवा या अखिल भारतीय सेवा आहेत. या सेवेतील सदस्य केंद्रातील आणि राज्यातील वरिष्ठ पदे धारण (महत्त्वाच्या स्थानी) करतात आणि दोन्ही ठिकाणी आळीपाळीने कार्यरत असतात.

सध्या खालील तीन अखिल भारतीय सेवा आहेत.

(१) भारतीय प्रशासकीय सेवा

(२) भारतीय पोलीस सेवा

(३) भारतीय वन सेवा

इ. स. १९४७ मध्ये भारतीय नागरी सेवेच्या जागी भारतीय प्रशासन सेवा आणि भारतीय पोलीसच्या जागी भारतीय पोलीस सेवा आली आणि राज्यघटनेने त्यांना अखिल भारतीय सेवा अशी मान्यता दिली. इ. स. १९६६ मध्ये भारतीय वन सेवा ही तिसरी अखिल भारतीय सेवा अस्तित्वात आली.[1]

अखिल भारतीय सेवा कायदा, १९५१ अनुसार अखिल भारतीय सेवेतील सदस्यांच्या भरती आणि सेवाशर्तींच्या नियमनासाठी राज्य सरकारांशी विचारविनिमय करून नियम बनविण्याचा केंद्र सरकारला अधिकार आहे. केंद्र सरकार या सेवांतील सदस्यांची भरती करते व त्यांना प्रशिक्षण देते. या सेवेतील सदस्य कामासाठी विविध राज्यांमध्ये नेमले जातात. ते विविध राज्यांच्या सेवांशी संलग्न असतात. ते केंद्र सरकारच्या सेवेमध्ये प्रतिनियुक्तीवर जातात आणि त्यांचा ठराविक कार्यकाल संपला की, संलग्न असलेल्या राज्यांत परत जातात. केंद्र सरकार या अधिकाऱ्यांची सेवा सर्वज्ञात, 'कालबद्ध पद्धती'ने प्रतिनियुक्तीवर घेते. जरी विविध राज्यांत या सेवा विभागल्या असल्या तरी प्रत्येक अखिल भारतीय सेवा एकच सेवा असून देशभर त्यांना समान अधिकार व दर्जा तसेच एकच वेतन श्रेणी असते. त्यांचे वेतन व निवृत्तिवेतन राज्य सरकार देते.

केंद्र व राज्य सरकार संयुक्तरीत्या अखिल भारतीय सेवांचे नियंत्रण करतात. सामान्य नियंत्रण राज्य सरकारकडे असते; तर अंतिम नियंत्रण केंद्र सरकारकडे असते. यातील अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई (दंडात्मक कारवाई) केंद्र सरकारच करू शकते.

(१) इ. स. १९६३ मध्ये भारतीय वनसेवा, भारतीय वैद्यकीय व आरोग्य सेवा आणि भारतीय अभियांत्रिकी सेवा या तीन नवीन अखिल भारतीय सेवा स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली; परंतु, यांपैकी फक्त भारतीय वनसेवा १९६६ मध्ये स्थापन करण्यात आली.

सरदार वल्लभभाई पटेल हे घटना समितीमध्ये अखिल भारतीय सेवेचे मुख्य समर्थक होते. त्यामुळे त्यांना अखिल भारतीय सेवांचे जनक मानले जाते.

## केंद्रीय सेवा

केंद्रीय सेवांतील कर्मचारी केवळ केंद्र सरकारच्या अधिकार क्षेत्रात काम करतात. ते केंद्र सरकारच्या विविध विभागांत विशेष (कार्यशाखेच्या आणि तांत्रिक) पदावर असतात.

स्वातंत्र्यापूर्वी केंद्रीय सेवांचे श्रेणी १, श्रेणी २, दुय्यम सेवा व कनिष्ठ सेवा असे भाग होते. स्वातंत्र्यानंतर दुय्यम सेवा व कनिष्ठ सेवा यांना श्रेणी ३ व श्रेणी ४ असे संबोधण्यात आले; परत १९७४ मध्ये श्रेणी १, श्रेणी २, श्रेणी ३ व श्रेणी ४ असे वर्गीकरण बदलून अनुक्रमे गट ए, गट बी, गट सी व गट डी असे करण्यात आले.

सध्या केंद्रीय सेवा गट ए मध्ये ६० सेवा आहेत. त्यांपैकी काही अशा–

(१) केंद्रीय अभियांत्रिकी सेवा
(२) केंद्रीय आरोग्य सेवा
(३) केंद्रीय माहिती सेवा
(४) केंद्रीय विधी सेवा
(५) केंद्रीय सचिवालयीन सेवा
(६) भारतीय लेखापरीक्षण व लेखा सेवा
(७) भारतीय संरक्षण लेखा सेवा
(८) भारतीय आर्थिक सेवा
(९) भारतीय परराष्ट्र सेवा
(१०) भारतीय हवामानशास्त्र सेवा
(११) भारतीय डाक सेवा
(१२) भारतीय महसूल सेवा (सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, आयकर)
(१३) भारतीय सांख्यिकी सेवा
(१४) विदेश संचार सेवा
(१५) रेल्वे कर्मचारी सेवा

उपरोक्त केंद्रीय गट ए सेवांना समांतर अशा गट बी सेवा आहेत. केंद्रीय सेवा गट सी मध्ये लिपिक कर्मचारी असतात; तर गट डी सेवांमध्ये श्रमिक कर्मचारी असतात. या प्रकारे गट ए व गट बी मध्ये राजपत्रित अधिकारी असतात तर गट सी व गट डी मधील कर्मचारी अराजपत्रित असतात.

केंद्रीय सेवांमध्ये प्रतिष्ठा, दर्जा, वेतन या दृष्टीने भारतीय परराष्ट्र सेवा ही सर्वोच्च सेवा गणली जाते. वस्तुतः केंद्रीय सेवा असली तरी पद, दर्जा व वेतनमान या दृष्टीने भारतीय परराष्ट्र सेवा अखिल भारतीय सेवांशी तुल्यबळ आहे. या सेवेचा क्रम भारतीय प्रशासन सेवेच्या खालोखाल असून या सेवेची वेतनश्रेणी भारतीय पोलीस सेवेच्या वरची आहे.

## राज्यसेवा

राज्यसेवेतील कर्मचारी केवळ राज्य सरकारच्या अधिकारक्षेत्रात काम करतात. ते राज्य सरकारांच्या विभागातील विविध पदांवर (सर्वसाधारण, कार्यशाखेच्या व तांत्रिक) असतात; परंतु, राज्याच्या प्रशासकीय

(२) हा बदल तिसऱ्या वेतन आयोगाच्या (१९७०-७३) शिफारशीनुसार करण्यात आला तर त्या आधीचा बदल पहिल्या वेतन आयोगाच्या (१९४६-४७) शिफारशीनुसार करण्यात आला.

श्रेणीबद्धतेत ते अखिल भारतीय सेवांमधील (भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा, भारतीय वन सेवा) अधिकाऱ्यांपेक्षा निम्न स्तरावर असतात.

राज्यसेवांची संख्या प्रत्येक राज्यात निराळी आहे. साधारणपणे सर्व राज्यांत असणाऱ्या सेवा खालीलप्रमाणे–

(१) नागरी सेवा
(२) पोलीस सेवा
(३) वन सेवा
(४) कृषी सेवा
(५) वैद्यकीय सेवा
(६) पशु वैद्यकीय सेवा
(७) मत्स्योद्योग सेवा
(८) न्यायिक सेवा
(९) सार्वजनिक आरोग्य सेवा
(१०) शिक्षण सेवा
(११) सहकार सेवा
(१२) पंजीकरण सेवा
(१३) विक्रीकर सेवा
(१४) तुरुंग सेवा
(१५) अभियांत्रिकी सेवा

यातील प्रत्येक सेवेला राज्याचे नाव दिले आहे. म्हणजेच सेवेच्या आधी राज्याचे नाव लावण्यात येते. उदाहरणार्थ– आंध्र प्रदेशमध्ये त्यांना आंध्र प्रदेश नागरी सेवा, आंध्र प्रदेश पोलीस सेवा, आंध्र प्रदेश वनसेवा, आंध्र प्रदेश कृषी सेवा असे, तर महाराष्ट्रात महाराष्ट्र वैद्यकीय सेवा, महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवा, महाराष्ट्र मत्स्योद्योग सेवा, महाराष्ट्र न्यायिक सेवा असे संबोधले जाते. सर्व राज्यसेवांमध्ये नागरी सेवा (प्रशासकीय सेवा म्हणूनही ओळखली जाते.) सर्वांत प्रतिष्ठेची मानली जाते.

केंद्रीय सेवांप्रमाणे राज्य सेवांचेही चार प्रकारांत वर्गीकरण करण्यात आले आहे. श्रेणी १ (गट १ किंवा गट ए) श्रेणी २ (गट २ किंवा गट बी) श्रेणी ३ (गट ३ किंवा गट सी) आणि श्रेणी ४ (गट ४ किंवा गट डी)

राज्यसेवांचे राजपत्रित आणि अराजपत्रित असे दोन भाग पडतात. सामान्यत: श्रेणी १ (गट ए) आणि श्रेणी २ (गट बी) हे राजपत्रित असतात तर श्रेणी ३ (गट सी) आणि श्रेणी ४ (गट डी) हे अराजपत्रित असतात. राजपत्रित वर्गातील सदस्यांची नावे भरती, बदली, पदोन्नती व निवृत्तीच्या वेळी सरकारी राजपत्रात प्रसिद्ध केली जातात तर अराजपत्रित वर्गातील सदस्यांची नावे प्रसिद्ध केली जात नाहीत. शिवाय राजपत्रित वर्गातील सदस्यांना काही विशेष अधिकार असतात; अराजपत्रित वर्गातील सदस्यांना असे विशेष अधिकार नसतात. या व्यतिरिक्त राजपत्रित वर्गातील सदस्यांना अधिकारी म्हटले जाते तर अराजपत्रित वर्गातील सदस्यांना कर्मचारी म्हटले जाते.

भारतीय प्रशासनिक सेवा (भाप्रसे), भारतीय पोलीस सेवा (भापोसे) आणि भारतीय वन सेवा (भावसे) मधील वरिष्ठ पदांवर कमाल ३३ टक्के म्हणजे एक–तृतीयांश टक्के पदे राज्य सेवेतील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीतून भरली जातील, असे अखिल भारतीय सेवा कायदा, १९५१ मध्ये म्हटले आहे. प्रत्येक राज्यातील या उद्देशाने स्थापन केलेल्या निवड समितीच्या शिफारशींनुसार अशी पदोन्नती केली जाते. अशा समितीच्या अध्यक्षपदी केंद्रीय लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य असतो.

राज्यघटनेच्या भाग १४ मधील कलम ३०८ ते ३१४ मध्ये अखिल भारतीय सेवा, केंद्रीय सेवा आणि राज्यसेवा यांबाबतच्या तरतुदी आहेत. या तरतुदी जम्मू आणि काश्मीर राज्याला लागू होत नाहीत, हे कलम ३०८ मध्ये स्पष्ट केले आहे.

**भरती व सेवा शर्ती**

कलम ३०९ ने केंद्राच्या आणि राज्याच्या लोकसेवेत भरती करण्याचे व सेवेत कार्यरत असलेल्या व्यक्तींची भरती व सेवाशर्ती यांचे नियमन करण्याचे अधिकार अनुक्रमे संसद व राज्य विधिमंडळांना दिले आहेत, असे कायदे करेपर्यंत, राष्ट्रपती किंवा राज्यपाल या बाबींचे नियमन करण्यासाठी नियम करू शकतात.

भरतीमध्ये व्यक्तीला लोकसेवेमध्ये घेण्याच्या नियुक्ती, निवड, पदनियुक्ती, पदोन्नती आणि बदलीने नेमणूक प्रकाराचा समावेश होतो.

लोकसेवकांच्या सेवाशर्तीमध्ये वेतन, भत्ते, वेळोवेळी होणारी वाढ, रजा, पदोन्नती, कार्यकाल किंवा सेवा समाप्ती, बदली, प्रतिनियुक्ती, विविध प्रकारचे अधिकार, शिस्तभंगाची कारवाई, सुट्या, कामाचे तास आणि निवृत्तिवेतन, भविष्य निर्वाहनिधी, उपादान इत्यादी निवृत्ती लाभांचा समावेश होतो.

या तरतुदींनुसार सचोटी, प्रामाणिकपणा, कार्यक्षमता, शिस्त, निष्पक्षपातीपणा, गुप्तता, तटस्थता, अनामिकत्व, कार्याप्रति समर्पण वृत्ती इत्यादींसाठी संसद किंवा राज्यविधिमंडळ लोकसेवकांच्या मूलभूत हक्कांवर वाजवी बंधने घालू शकते. अशी बंधने केंद्रीय सेवा (आचार) नियम, रेल्वे सेवा (आचार) नियम इत्यादी मध्ये नमूद करण्यात आली आहेत.

**कार्यकाल**

संरक्षण सेवा, केंद्राची नागरी सेवा, अखिल भारतीय सेवा यांचे सदस्य किंवा सैन्यातील पदावरील व्यक्ती व नागरी पदावरील व्यक्ती[३] या राष्ट्रपतीच्या इच्छेनुसारच पदावर राहू शकतात, असे कलम ३१० मध्ये म्हटले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील नागरी सेवेचे सदस्य किंवा राज्यामध्ये नागरी पदावरील व्यक्ती राज्यपालाच्या इच्छेनुसारच पदावर राहू शकतात.

परंतु, मर्जीनुसार काढून टाकण्याच्या सर्वसाधारण नियमाला एक अपवाद आहे. विशेष अर्हता असलेल्या व्यक्तींच्या सेवेसाठी पुढील दोन परिस्थितींमध्ये नुकसान भरपाईची तरतूद आहे– (१) करारात ठरलेला कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पद रद्द करण्यात आले असेल, किंवा– (२) त्याच्या वर्तनाशी संबंध नसलेल्या कारणासाठी त्याला पदमुक्त करण्यात येत असेल. असा करार नवीन व्यक्तीबरोबर म्हणजे जो संरक्षण सेवा केंद्रातील नागरी सेवा, अखिल भारतीय सेवा किंवा राज्याची सेवा यांचा सदस्य नसेल, अशा व्यक्तीबरोबरच करता येतो.

**नागरी सेवकांसाठी संरक्षक उपाययोजना**

'मर्जीनुसार पदावर राहणे' या तत्त्वाला कलम ३११ मध्ये दोन बंधने घातली आहेत. म्हणजेच मनमानीपणे पदमुक्त करण्याविरुद्ध दोन संरक्षक उपाययोजनांची तरतूद या कलमात करण्यात आली आहे.

(१) ज्या अधिकाऱ्याने नियुक्ती केली आहे त्याच्यापेक्षा दुय्यम अधिकारी नागरी सेवकाला पदमुक्त किंवा पदच्युत करू शकत नाही.[४]

---

(३) नागरी पद म्हणजे प्रशासनाच्या नागरी विभागात (सैन्य विभागात नव्हे) नियुक्ती, स्थान किंवा नोकरी.

(४) पदच्युती आणि पदमुक्तीतील फरक म्हणजे पदच्युतीमध्ये तो भविष्यामध्ये सरकारी नोकरीसाठी अपात्र ठरतो, तर पदमुक्तीमध्ये तो भविष्यामध्ये सरकारी नोकरीसाठी अपात्र ठरत नाही.

(२) सेवकाविरुद्धचे आरोप त्याला सांगितल्याशिवाय, आरोपांची चौकशी केल्याशिवाय तसेच आरोपांबाबत आपली बाजू मांडण्याची योग्य संधी दिल्याशिवाय नागरी सेवकाला पदमुक्त किंवा पदच्युत करता येत नाही व पदावनतही करता येत नाही.[५]

या संरक्षक उपाययोजना फक्त केंद्रातील नागरी सेवा, अखिल भारतीय सेवा, राज्यातील नागरी सेवा किंवा केंद्रात किंवा राज्यात नागरी पदावरील व्यक्ती यांच्यासाठी असून संरक्षण सेवा किंवा सैन्यातील पदांवरील व्यक्तींसाठी नाहीत.

वरीलपैकी दुसरी उपाययोजना (चौकशी करणे) खालील तीन परिस्थितींमध्ये लागू होत नाही–

(१) ज्यावेळी नागरी सेवक त्याच्या आचारामुळे फौजदारी गुन्ह्यात अपराधी म्हणून सिद्ध झाल्याने पदमुक्त, पदच्युत किंवा पदावनत केला जात आहे.

(२) ज्यावेळी काही कारणासाठी (लेखी नोंदवणे आवश्यक आहे) चौकशी करणे शक्य होणार नाही असे पदमुक्त, पदच्युत किंवा पदावनत करण्याचे अधिकार असलेल्या अधिकाऱ्याला वाटते.

(३) ज्यावेळी देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने चौकशी करणे योग्य ठरणार नाही, असे राष्ट्रपतीस किंवा राज्यपालास वाटते.

सुरुवातीला नागरी सेवकाला आपली बाजू मांडण्याची संधी दोन टप्प्यांत मिळत असे. चौकशीच्या वेळी व शिक्षेच्या वेळी. परंतु बेचाळिसावी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७६ अन्वये दुसऱ्या संधीची (चौकशीच्या निष्कर्षानुसार प्रस्तावित शिक्षेविरुद्ध बाजू मांडण्याचा नागरी सेवकाचा हक्क) तरतूद रद्द केली गेली. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत, चौकशी नंतर नागरी सेवकास पदमुक्त करण्याची, पदच्युत करण्याची किंवा पदावनत करण्याची शिक्षा प्रस्तावित असेल, त्यावेळी चौकशीच्या वेळी मांडलेला साक्षीपुरावा विचारात घेऊन व प्रस्तावित शिक्षेविरुद्ध बाजू मांडण्याची संधी न देता ही शिक्षा देण्यात येईल.

दुसऱ्या उपाययोजनेत उल्लेख केलेली नागरी सेवकाला देण्यात येणाऱ्या 'आपली बाजू मांडण्याची योग्य संधी' यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

(१) आपल्याविरुद्धचे गुन्हे नाकारणे व आपण निरपराधी असल्याचे सिद्ध करणे. त्याच्याविरुद्ध कोणते गुन्हे आहेत आणि कोणत्या आरोपावर हे गुन्हे आधारलेले आहेत, हे त्याला सांगितल्यावरच तो असे करू शकेल.

(२) त्याच्याविरुद्ध साक्ष दिलेल्या साक्षीदारांची उलट तपासणी घेऊन आपले संरक्षण करण्याची आणि आपल्या बाजूने स्वतःची किंवा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्याची संधी त्यास देणे.

(३) शिस्तभंगाची कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्याने चौकशी अहवाल विचारात घेण्यापूर्वी त्याने दोषी नागरी सेवकाला चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल त्याच्या पाहणीसाठी व त्यांवर त्यास त्याचे म्हणणे मांडता यावे यासाठी दिला पाहिजे.

**अखिल भारतीय सेवा**

अखिल भारतीय सेवांच्या संदर्भात कलम ३१२ मध्ये खालील तरतुदी आहेत.

(१) राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने नवीन अखिल भारतीय सेवा (अखिल भारतीय न्यायिक सेवा धरून) स्थापन करणे आवश्यक व योग्य आहे असा ठराव जर राज्यसभेने संमत केला तर संसद तशी नवी सेवा सुरू करू शकते. राज्यसभेतील अशा ठरावाला उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांचा

(५) पदावनती म्हणजे वरच्या पदावरून किंवा श्रेणीमधून खालच्या पदावर किंवा श्रेणीत आणणे. नागरी सेवकावर केलेली ही दंडात्मक स्वरूपाची कारवाई आहे.

पाठिंबा मिळाला पाहिजे. भारतातील संघराज्य प्रणालीत राज्यांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने अशी शिफारस करण्याचा अधिकार राज्यसभेला देण्यात आला आहे.

(२) संसद अखिल भारतीय सेवेत नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या भरतीचे व सेवाशर्तीचे नियमन करू शकते. त्यानुसार संसदेने अखिल भारतीय सेवा कायदा, १९५१ संमत केला आहे.

(३) राज्यघटना लागू होण्याच्या वेळी (२६ जानेवारी, १९५०) भारतीय प्रशासकीय सेवा आणि भारतीय पोलीस सेवा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सेवा संसदेने या तरतुदीखाली स्थापन केलेल्या सेवा मानल्या जातील.

(४) अखिल भारतीय न्यायिक सेवेमध्ये जिल्हा न्यायाधीशाच्या खालचे पद असता कामा नये.[६] ही सेवा स्थापन करण्याबतचा कायदा ही कलम ३६८ साठी घटनादुरुस्ती म्हणून मानण्यात येणार नाही.

जरी बेचाळिसावी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७६ अन्वये अखिल भारतीय न्यायिक सेवेची तरतूद केली असली तरी तसा कायदा अद्यापि करण्यात आलेला नाही.

**इतर तरतुदी**

अठ्ठाविसावी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७२ अन्वये समावेश केलेल्या कलम ३१२ ए अन्वये १९५० पूर्वी भारतामध्ये राजसत्तेने नागरी सेवेत नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या सेवाशर्ती बदलण्याचा किंवा रद्द करण्याचा संसदेला अधिकार देण्यात आला. कलम ३१३ या संक्रमणाच्या तरतुदी असून जोपर्यंत इतर तरतुदी केल्या जात नाहीत, तोपर्यंत १९५० पूर्वीचे कायदे आणि कोणत्याही लोकसेवांना लागू असलेले कायदे चालू राहतील. कलम ३१४ मधील काही सेवांतील विद्यमान अधिकाऱ्यांच्या संरक्षणाच्या तरतुदी अठ्ठाविसावी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७२ अन्वये रद्द करण्यात आल्या आहेत.

**दृष्टिक्षेपात लोकसेवासंबंधित कलमे**

| कलम | विषय |
|---|---|
| ३०८ | अन्वयार्थ. |
| ३०९ | केंद्र किंवा एखाद्या राज्यातील सेवा करणाऱ्या व्यक्तींची भरती व सेवाशर्ती |
| ३१० | केंद्र किंवा एखाद्या राज्यातील सेवा करणाऱ्या व्यक्तींचा कार्यकाल |
| ३११ | केंद्र किंवा एखाद्या राज्यामध्ये नागरी पदावर काम करणाऱ्या व्यक्तींची पदच्युती, पदमुक्ती व पदावनती |
| ३१२ | अखिल भारतीय सेवा |
| ३१२ ए | काही सेवांमधील अधिकाऱ्यांच्या सेवांत बदल करण्याचा किंवा रद्द करण्याचा संसदेचा अधिकार |
| ३१३ | संक्रमणात्मक तरतुदी |
| ३१४ | काही सेवांतील विद्यमान अधिकाऱ्यांच्या संरक्षणाबाबत तरतुदी (रद्द केले आहे.) |

(६) 'जिल्हा न्यायाधीश' या संज्ञेमध्ये शहरातील दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, संयुक्त जिल्हा न्यायाधीश, साहाय्यक जिल्हा न्यायाधीश, स्मॉल कॉजेस न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश, मुख्य प्रांतिक न्यायाधीश, अतिरिक्त मुख्य प्रांतिक न्यायाधीश, सत्र न्यायाधीश, अतिरिक्त सत्र न्यायाधीश व साहाय्यक सत्र न्यायाधीश यांचा समावेश होतो.